## सातारा शहरातील ग्रामीण भागातील महिलांचा पंचायतीतील सहभाग : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. संध्या पौडमल समाजशास्त्र प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर, जिल्हा - सातारा (महाराष्ट्र).**

---

**प्रस्तावना :**

पंचायत राज ही एक ग्रामीण स्तरावर लोकशाही तत्वानुसार कार्यरत असणारी एक प्रभावी स्वयंशासित यंत्रणा आहे. पंचायत राज ही जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यामधील दुवा म्हणून कार्यरत असते. त्यामुळे पंचायत राजचे अनेक खेड्याशी तसेच तालुक्यांशी दृढ संबंध तयार झालेले असतात. पंचायत राज हा देशातील लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत पाया आहे. पंचायतराज व्यवस्थेमध्ये लोकांच्या निर्णयक्षमतेला अनन्यसाधारण महत्व असते. स्थानिक पातळीवरील लोकांच्या समस्या जाणून त्याबाबत जनजागृती करण्याचे महत्वपूर्ण कार्य याअंतर्गत होत असते. भारतीय राज्यघटनेनुसार पंचायतराज हा राज्य अखत्यारीतील विषय असून त्याची रचना, कार्ये व अधिकार ठरवण्याचा अधिकार राज्य व केंद्रशासित प्रदेशांना दिला आहे. याचीच परिणीती म्हणून देशातील काही राज्यांनी त्रिस्तरीय, व्दिस्तरीय आणि एक स्तरीय प्रणालीचा अवलंब केला आहे.

आधुनिक काळात ग्रामपंचायतींची संकल्पना आणि तत्वे पुनर्भाषित व पुनर्रविश्लेषित करण्यात आलेली आहेत. यामध्ये लोकशाही, समाजकल्याण व समाजाचा विकास यासारख्या मूलभूत घटकावर भर देण्यात आलेला आहे. भारतीय राज्यघटनेची तत्वे व उद्दिष्टानुसार राज्यसरकारने ग्रामपंचायत निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारायची आहे व त्यानुसार ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्याचे वाटप करून त्यांना स्वयंशासनाचे घटक बनवायाचे आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनात्मक विकास कार्यात लक्षणीय वाढ झाल्यामुळे ग्रामपंचायत ही विकेंद्रीत प्रशासनाचा एक मूलभूत घटक आहे.

समाजातील दुर्लक्षित घटकांना तसेच महिलांना प्रशासनात सहभागी केल्यामुळे लोकशाही विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीचा पाया भक्कम बनला आहे. जातिव्यवस्थेची मूलतत्वे तसेच पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव कमी होऊन समतेवर आधारित सामाजिक न्याय, समानता आणि विकास यांची जोपासना ग्रामीण भागातील राजकारणामध्ये होत असलेली दिसून येते. विकेंद्रित लोकशाहीचे सर्वात मोठे फलित म्हणजे पंचायतींमधून स्त्री नेतृत्व उदयास येणे होय असे म्हणता येईल. भारतातील पुरूषप्रधान समाजाने महिलांच्या कार्याला फक्त चूल आणि मूल एवढ्यापुरते सीमित केले होते आणि महिलांना सामाजिक कार्यक्रमांमध्ये प्रवेश घेण्यास मज्जाव केला होता. ज्याप्रमाणे परंपरागत जातिव्यवस्थेने दलितांना अधिकार नाकारले होते त्याचप्रमाणे पंचायतींनी स्त्रियांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेतले नव्हते.

ग्रामीण भागातील पुरूषप्रधान संस्कृतीचा महिलांच्या सामाजिक तसेच राजकीय जीवनपटलावर दूरगामी परिणाम झाला असून महिलांकडे केवळ अबोल प्रेक्षक म्हणून पाहिले जात होते. तथापि, लोकशाही विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून महिलांच्या अधिकारांमध्ये दूरगामी व मूलभूत असे बदल घडून आल्याचे जाणवते. भारतीय राज्यघटनेने पंचायतराज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना एक तृतीयांश स्थान देऊन पुरूषप्रधान संस्कृतीच्या निर्णय प्रक्रियेला एकप्रकारचा धक्काच दिला आहे. स्वातंत्रोत्तर काळात महिलांच्या नेतृत्वगुणामध्ये झालेली वाढ हा एक आमूलाग्र बदल मानला जातो. संपूर्ण देशातील पंचायतीमध्ये एक कोटीहून अधिक म्हणजेच ५१.२२% महिला निवडून गेलेल्या आहेत. ही एक विलक्षण बाब आहे. अशाप्रकारे कायद्याने विहित केलेल्या प्रमाणापेक्षा अधिक महिला पंचायतींमध्ये काम करत असल्याचे दिसून येतात.

तसेच, महिला या पंचायतींमध्ये काम करीत असताना त्यांच्या कामाच्या पध्दतीमध्ये काही त्रुटी असल्याचेदेखील आढळून आले आहे. अभ्यासाअंती असे निदर्शनास आले आहे की, पंचायतींमध्ये काम करणा-या महिलांना प्रामुख्याने तीन प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. सर्वप्रथम, पंचायतींमध्ये महिला सदस्य, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून काम करीत असताना त्यांना आपल्या जबाबदा-या पार पाडताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. बहुतांश ठिकाणी निरक्षरता व अनुभवाची कमतरता असल्याने पंचायतींतील महिला या त्यांची कर्तव्ये पार पाडण्यात असमर्थ असल्याचे दिसून येतात. तसेच त्या आपल्या अधिकाराचा प्रभावीपणे वापर करण्यास असमर्थ असल्याचे दिसून येते. अशावेळी महिला पुरूषप्रधान संस्कृतीला सहज बळी पडतात व ही पुरुष मंडळी महिलांच्या कार्यालयातील खुर्चीवर जणूकाही आपलाच अधिकार आह असे वागत असतात. त्यातील अनेकजण स्वत:ला सरपंचपती म्हणून मिरवताना आढळतात.

पुरूषप्रधान समाजाकडून पंचायतीतील महिला सदस्यांविरोधात समस्या निर्माण करणे ही दुसरी बाब आढळून आली आहे. अभ्यासाअंती असे आढळून आले आहे की, महिला या पंचायतीमध्ये प्रभावीपणे काम करण्यास पुरूषप्रधान समाज व्यवस्था फार मोठी अडथळा ठरली आहे. जेव्हा काही महिला आपले म्हणणे ठामपणे मांडतात तेव्हा काही पुरूष

मंडळी त्यांना निर्लज व कुचकामी असे संबोधतात. यातील तिसरी गंभीर बाब म्हणजे पंचायतराजमध्ये महिलांच्या सहभागाचा अभाव. पंचायतराजमध्ये काम करणा-या महिलांना असे वाटते की पंचायतीमध्ये त्यांचे असणारे पद हे नावापुरतेच आहे. कुटुंब सांभाळणे आणि परंपरागत संस्कृती जपणे हे त्याहूनही अधिक महत्वाचे आहे. बहुतांश वेळा पंचायतीमध्ये काम करणा-या महिला त्यांच्याच ग्रामीण भगिनींच्या समस्या समस्या सोडविण्यात असमर्थ ठरतात. या महिला पंचायतींच्या सभांना नियमानुसार हजर राहतात परंतू शासन कारभार चालवण्यात मात्र बहुतांश वेळी असमर्थ ठरतात. सदर प्रकरणात साता-यामधील ग्रामीण भागातील पंचायतीमधील महिला सदस्यांचा अभ्यास केला गेला आहे.

**उद्दिष्टये :**

१) पंचायतीतील महिला सदस्यांची जात. उतपन्न, शिक्षण, इत्यादींचा अभ्यास करणे.

२) पंचायतीनी ग्रामीण भागात केलेल्या विकास कामाचा आढावा घेणे.

३) पंचायतीच्या सभांमध्ये महिला स्वयंस्फूर्तेने सहभागी होतात का याचा अभ्यास करणे.

**व्याप्ती आणि कार्यपध्दती:**

सातारा ग्रामीण भागाचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे. उत्तर महाराष्ट्राच्या पूर्वेकडील भागात सातारा शहर वसलेले आहे. सातारा जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०४८० स्क्वे कि.मी. आहे. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरापासून २८५ कि.मी. अंतरावर सातारा जिल्हा वसलेला आहे. सातारा जिल्ह्यातील परळी, शिवधर, नागठाणे, खेड, कोंडवे, शेंद्रे, आसनगाव या पंचायतींचा अभ्यास प्रस्तुत लेखात केला आहे.एकूण ८३७ पंचायत महिला सदस्यांकडून प्राथमिक आणि दुय्यम स्वरूपात माहिती एकत्रित केली आहे. महिला पंचायत सदस्यांकडून माहिती गोळा करण्यासाठी निरीक्षणावर आधारित मुलाखत अनूसुची पध्दतीचा अवलंब केला आहे.

**विश्लेषण आणि चर्चा :**

प्रतिसाद देणा-या महिलांच्या वेगवेगळ्या पैलूंचे विश्लेषण आणि चर्चा पुढीलप्रमाणे केली आहे.

**प्रतिसाद्यांचे शिक्षण -**

प्रतिसाद देणा-या महिलांच्या शैक्षणिक पात्रतेचा प्रभाव त्यांच्यावर खूप प्रमाणात पडत असतो. ग्रामीण भागाचा विकास करणा-या पंचायत सदस्यांची ध्येयधोरणे आणि महत्वकांक्षा ठरवण्यात शिक्षणाची भूमिका महत्वाची असते. प्रतिसाद देणा-या महिल्यांच्या शैक्षणिक पात्रतेची आकडेवारी खालील सारणीमध्ये दाखवलेली आहे.

सारणी क्र. १ प्रतिसाद्यांचे शिक्षण

| अ.क्र. | शिक्षण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अशिक्षित | १९७ | २३.५३ |
| २ | प्राथमिक / माध्यमिक | २५० | २९.८६ |
| ३ | पदवीपूर् | २९० | ३४.६४ |
| ४ | पदवी | ९३ | ११.११ |
| ५ | पदव्यूत्तर | ०७ | ००.८६ |
| ६ | एम.फिल/पी.एचडी. संशोधन | -- | -- |
| | एकूण | ८३७ | १०० |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, एकही पंचायत महिला सदस्यांने एम.फिल किंवा पीएच.डी. यासारखे संशोधन केलेले नाही. विशेषत: २९०(३४%) पंचायत सदस्यांनी त्यांचे पदवी पूर्वीचे शिक्षण पूण केले आहे. २५० (२९.८६%) पंचायत महिला सदस्यांनी त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. जवळजवळ १९७ (२३.५३%) पंचायत महिला सदस्य अशिक्षित असल्याचे दिसून येते. ९३ (११.११%) पंचायत महिला सदस्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे तर ७ (००.८६%) सदस्यांनी पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण केल्याचे आढळून येते. सर्वसामान्यत: असे दिसून येते की, बहुतांश पंचायत महिला सदस्या ह्या उच्च माध्यमिक, माध्यमिक किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या आहेत.

**प्रतिसाद देणा-या महिलांचा प्रवर्ग -**

सामाजिक न्याय आणि लिंगभेद समभाव अस्तित्वात येण्यासाठी तसेच नगरपालिका किंवा पंचायत यासारख्या स्थानिक संस्थामध्ये प्रवर्ग आणि लिंग यांचे प्रतिनिधीत्व करणारे कायदे राज्य आणि केंद्र सरकारने आधीच पारित केले आहेत. प्रतिसाद देणा-या महिलांच्या जातनिहाय माहितीचे सादरीकरण खालील सारणीत दिले आहे.

**सारणी क्र. २ प्रतिसाद देणा-या महिलांचा प्रवर्ग**

| अ.क्र. | प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३८ | १६.४८ |
| २ | अनुसूचित जमाती | १४ | ०१.४८ |
| ३ | इतर मागास वर्ग | ४४० | ५२.५६ |
| ४ | इतर / सर्व साधारण | २४५ | २९.२८ |
| | एकूण | ८३७ | १०० |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, ८३७ प्रतिसाद देणा-या महिलांपैकी ४४० (५२.६०%) महिला सदस्या इतर मागासवर्गीय जातीतील आहेत. २४५ (२९.२९%) पंचायत सदस्या ह्या सर्वसाधारण प्रवर्गातील आहेत. १३८ (१६.४८%) ह्या मागासवर्गीय प्रवर्गातील आहेत. तसेच १४ (०१.६८%) ह्या महिला भटक्या जमातीच्या आहेत.

**सरासरी मासिक उत्पन्न -**

एखाद्या कुटुंबाची आर्थिक स्थिती त्याच्या उत्पन्नावरून ठरते. एखाद्या कुटुंबाचे राहणीमानसुध्दा त्याच्या उत्पन्नावरून ठरविले जाते. प्रतिसाद देणा-या पंचायत महिला सदस्यांच्या सरासरी मासिक उत्पन्नची माहिती खालील सारणीत सादर केली आहे.

**सारणी क्र. ३ सरासरी मासिक उत्पन्न**

| अ.क्र. | सरासरी मासिक उत्पन्न | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २००० रू. पेक्षा कमी | १२ | १.४४ |
| २ | २००१ रू. ते ३५०० रू. | १५० | १७.९२ |
| ३ | ३५०१ रू. ते ५००० रू. | २०० | २३.९० |
| ४ | ५००१ रू. ते ७५०० रू. | ४०० | ४७.७८ |
| ५ | ७५०१ रू. ते १०००० रू. | ४० | ०४.७८ |
| ६ | १०००० रू. पेक्षा अधिक | ३५ | ०४.१८ |
| | एकूण | ८३७ | १०० |

प्रतिसाद देणा-या महिलांच्या उत्पन्नावरून असे दिसून येते की, ४००(४७.७८%) प्रतिसाद देणा-या महिलांचे मासिक उत्पन्न ५००१ ते ७५०० रू. इतके आहे. २०० (२३.९०%) प्रतिसाद देणा-या महिलांचे मासिक उत्पन्न ३५०१ ते ५००० रू. इतके आहे. १५० (१७.९२%) प्रतिसाद देणा-या महिलांचे मासिक उत्पन्न २००१ ते ३५०० रू. इतके आहे. जवळजवळ ४० (४.७८%) प्रतिसाद देणा-या महिलांचे मासिक उत्पन्न ७५०१ ते १०००० रू. इतके आहे. ३५ (०४.१८%) प्रतिसाद देणा-या महिलांचे मासिक उत्पन्न १०००० रू. इतके आहे.तर उरलेल्या १२(०१.४%) प्रतिसाद देणा-या महिलांचे मासिक उत्पन्न २००० रूपयांपेक्षा कमी आहे. यावरून असे दिसून येते की, बहुतांश प्रतिसाद देणा-या महिला ह्या आर्थिकदृष्ट्या मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत.

**पंचायत अस्तितावात आल्यापासून खेडयांच्या विकासातील प्रगती :**

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हा पंचायत सुरू करण्यापाठीमागचा मुख्य हेतू होता. त्यामुळे महाराष्ट्रात पंचायती सुरू केल्यानंतर ग्रामीण भागाची प्रगती झाली का हे पाहणे गरजेचे आहे. या अनुषंगाने महिला पंचायत सदस्यांची खेडयांच्या प्रगतीबाबत मते घेण्यात आली. त्याचे सादरीकरण पुढील सारणीत केले आहे.

**सारणी क्र. ४ पंचायत अस्तितावात आल्यापासून खेडयांच्या विकासातील प्रगती**

| अ.क्र. | घटक | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्णत: सहमत | २२० | २६.२१ |
| २ | ब-याच अंशी सहमत | ४११ | ४९.१० |
| ३ | काही अंशी सहमत | २०६ | २४.६९ |
| ४ | सहमत नाही | ०० | ००.०० |
| | एकूण | ८३७ | १०० |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, एकूण पंचायत महिला सदस्यांपैकी ४११(४९.१०%) महिला सदस्या पंचायत सुरू झाल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास झाला आहे या मताशी ब-याच अंशी प्रमाणात सहमत आहेत. २२० (२६.२१%) महिला या वरील विधानाशी पूर्णत सहमत आहेत. उरलेल्या २०६ (२४.६९%) महिला या वरील विधानाशी काही अंशी सहमत आहेत. पंचायत सुरू झाल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास झाला आहे ही बाब खूपच समाधानकारक आहे.

**पंचायत सभांमधील सहभाग :**

पंचायतमध्ये काम करीत असलेल्या महिलांना घरामध्ये व समाजामध्ये अशा दुहेरी जबाबदा-या पार पाडाव्या लागतात. पंचायतमध्ये काम करीत असताना महिलांना गावातील अनेक बाबी कुशलतेने हाताळणे, पंचायत सभांमध्ये स्वयंस्फूर्तपणे सहभागी होणे तसेच अनेक कल्याणकारी योजना राबवत असताना सरकारी अधिका-यांना भेटणे इत्यादी जबाबदा-या पार पाडाव्या लागतात अनेक प्रकरणामध्ये असे दिसून आले आहे की महिला सदस्यांना पुरूष सदस्यांसोबत पंचायत सभांमध्ये सहभागी होणे शक्य नसते. या अनुषंगाने महिला सदस्यांना पंचायत समित्यांच्या सभांमध्ये सहभागी होता येते की नाही याबाबत विचारणा करण्यात आली. त्याची माहिती खालील सारणीवरून दिसून येते.

**सारणी क्र. ५ पंचायत सभांमधील सहभाग**

| अ.क्र. | सहभाग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ७०२ | ८३.८७ |
| २ | नाही | १३५ | १६.१३ |
| | एकूण | ८३७ | १०० |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, ७०२(८३.८७ %) महिला सदस्या स्वयंस्फुर्तपणे सभेमध्ये सहभागी होतात. तर उरलेल्या १३५ (१६.१३%) महिला या स्वयंस्फुर्तपणे सभेमध्ये सहभागी होत नाहीत. यावरून असे दिसून येते की, महिलांना राजकारणामध्ये विशेष रस असतो.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण, निरीक्षण आणि मुलाखत अनुसूचीव्दारा महिला उत्तरदात्याकडून वस्तुस्थिती जाणून घेता येऊ शकेल. यासाठी शोधनिबंध पूर्ण करण्याची 'वर्णनात्मक संशोधन आराखडा' या प्रकाराची निवड केलेली आहे. शोधनिबंधासाठी सर्वच ८३७ महिला सदस्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

**निष्कर्ष :**

पंचायत महिला सदस्यांच्या जातीनिहाय विभागणीवरून असे दिसून येते की, पंचायत समितीमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात सामाजिक न्याय व समानतेचे ततव यशस्वीपणे अंमलात आणले आहे. प्रतिसाद देणा-या व्यक्तींचे शिक्षण कमी आहे आणि मासिक उत्पन्न मध्यम आहे. पंचायत सुरू झाल्यापासून खेडयांचा विकास झाला आहे. या विधानाशी बहुतांश पंचाय महिला सदस्या पूर्णतः सहमत आहेत. निश्चितच, बहुतांश महिला सदस्या कुशलतेने पंचायत सभांमध्ये सहभागी होतात. थोडक्यात असे म्हणता येईल की महिलांच्या निर्णयक्षमतेमध्ये शिक्षणाची भूमिका फार महत्वाची आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

**सातारा जिल्हा गॅझेटिअर**

www.maharashtragov.in

www.gov.in